# व्यक्ती-वल्ली - शिवाजी पार्कची अष्टपैलू पुष्पा मोडक

*"वाह, क्या बात है जयु. असे कित्येक हिरे, या शिवाजी पार्कच्या भूमीत दडले असतील."* असं आल्हाद/चंदू धनेश्वरने मला शिवाजी पार्कची पहिली कमर्शियल पायलट महिला कॅप्टन चंदा सावंतवरील लेख वाचून कळवलं होतं. आणि तो म्हणतो तेही खरं आहे. परंतु, जे दडलेले व स्वयं-प्रकशित अनमोल हिरे आहेत त्यावर मी अधिक प्रकाश टाकून त्याची वेळोवेळी दखल घेतली आहे व घेतही आहे. कांही झांकली माणकं आहेत तीही शोधून काढून मी प्रकाशात आणली आहेत. हे बहुश्रुत आहे. शिवाय, त्यात मुलखावेगळी तर अनेक आहेत. याचा मला अभिमान आहे. खरं म्हटलं तर वैभवी शिवाजी पार्क आणि तेथील कीर्तिवंत बालमोहनकर हे समीकरण म्हणजे, कधीही न संपणारी इतिहासाची पानं आहेत. मात्र *'आम्ही बालमोहनकर'* हे यू-ट्यूबवरील सध्या सेलिब्रेटी सदर बघतांना कौतुकाने मनात शंकावजा विचार येतो की, ही सेलिब्रेटी मंडळी शाळेत तरी केव्हा जात होती. मला आठवतंय आम्ही शाळेत असतांना फावल्या वेळात (शाळा सांभाळून) आमच्या आवडीचे खेळ खेळलो होतो. आणि शाळेसाठीही, तेही उत्तमपणे. म्हणजे, शाळा प्रथम मग खेळ होता. ही तक्रार नव्हे. असो. शिवाजी पार्कच्या जवळच असलेल्या MGMO (महात्मा गांधी मेमोरियल ऑलिम्पिक) Swimming Pool वर त्यावेळी अनेकजण जात होते. मला आठवतंय त्यावेळी आमच्या बालमोहनची लोभस व्यक्तिमत्वाची, खिलाडू वृत्तीची व पोहण्यात तरबेज असणारी आमची स्नेही जलतरणपटू 'पुष्पा मोडक' Breaststroke Swimming मध्ये गौरवास्पद नांव कमावून होती. यावरून शिवाजी पार्कच्या माझ्या एक मित्राने सांगितलं, *"अरे जयु, proud to say, Pushpa was not only a good swimmer but, she was so charming looking girl who stole many hearts at that time..."* अभिमानाची बाब अशी की स्थानिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्विमिंग स्पर्धेत तिने प्राविण्य मिळविली होती. तसेच, अभ्यासाव्यतिरिक्त शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमातही तिचा सहभाग असे. थोडक्यात, शालेय व कॉलेज जीवनात इंडो-सिलोनपासून ते एशियन लहानमोठ्या

जलतरण स्पर्धेत भाग घेऊन अनेक पारितोषिके मिळविली होती. शिवाय, शाळेत असतांना पुष्पाने 'संत मीराबाई' या नाटकात एक भूमिकाही केली होती. हे सर्व अभिमानस्पद व कौतुकास्पद होतं...

कॉलेजातून वैद्यकीय शिक्षण घेतल्यावर पुष्पावर वेळीच मोहिनी टाकून किंग जॉर्जच्या अनिल भडसावळे याने लग्नानंतर पुष्पाचे नांव 'मोहिनी' ठेवून उच्च शिक्षणासाठी दोघांनी अमेरिकेत स्थलांतर केले. त्यानंतर आपलं वैद्यकीय क्षेत्र सांभाळू स्वतःच्या कर्तबगारीवर पुष्पाने स्वतःच्या ज्वेलरी व्यवसायात यशस्वी होऊन उल्लेखनीय नांव कमावलं याची मला कल्पना होती. त्याला अनेक वर्ष लोटली होती. तरीही कांही कारणांनी अधुनमधून आमचा संपर्क होत असे. आता निवृत्ती





*1) Pushpa's colorful 151, 'Shree Niwas' house on Pandurang Naik Marg (Rd No 5), at Shivaji Park... Photo courtesy: Pushpa. 2) Pushpa Modak (extreme right) with UN Observers at Agra Fort near Taj Mahal in 1966 at National Swimming Championship in Delhi... Photo courtesy: Anand Sarang.*

जीवनात गतस्मृतींना अधिक उजाळा मिळतो. आणि तेच दिवस आपल्याला संजीवनी देणारे असतात. नेमका याचवेळी माझी व पुष्पाची पुनः भेट झाली. *म्हणाली,"जयंत, मी तुझे सर्व लेख नियमित वाचते. सुंदर लिहितोस पण, त्याला प्रत्युत्तर देणं जमत नाही. आता मीही माझ्या ज्वेलरी व्यवसायातून निवृत्त झाले आहे. तसेच, आम्ही तुमच्याजवळ रहायला आलो आहोत. म्हणजे, आमच्या वाढत्या व्यवसायामुळे एक पाय डेलावेयरला व दुसरा जेथे होता तेथे पेसिव्हेनियात आहे. परवाच आम्हाला मेरीलँडचा प्रदीप/गिट्टया भागवत भेटायला आला होता. शिवाजी*

*पार्कच्या व स्विमिंगच्या पूलच्या खुप गप्पा मारल्या. गिट्टयाशी गप्पा मारतांना तुझी व वीणाची प्रकर्षाने आठवण निघाली. तुम्ही दोघं कसे आहात..? आता लॉकडाऊन संपल्यावर डेलावेयरला आमच्या घरी या...”* तिच्याशी बोलतांना कळलं की, यापूर्वी अमेरिकेतही स्थानिक स्विमिंग स्पर्धेत तिने प्राविण्य मिळविली होती. तसेच, अनेक जलतरण स्पर्धांच्या स्पर्धेत परीक्षक म्हणून पुष्पाने कामगिरी केली होती. तसेच, अपंगांनाही ती स्विमिंग शिकवीत होती. तिच्या दोन गुणी मुलींनाही लहानपणी पोहण्याचे रीतसर शिक्षण दिले होते...

पुष्पाचा मोठा भाऊ दिलीप हा डेंटिस्ट होता व आमच्या बिल्डिंगमध्ये रहाणाऱ्या कुमार बोन्द्रे याचा शाळेपासूनचा जिवलग मित्र होता. त्यामुळे तो नेहमी भेटत असे. पुष्पाच्या वडिलांची डॉ. दिनकरराव व डॉ. दिलीपची मेडिकल प्रॅक्टिस प्लाझा सिनेमाजवळ होती. धार्मिक वळणाचे पुष्पाचे आई-वडील सामाजिक कार्यकर्तेही होते. तसेच, पुष्पाच्या व आमच्या आई-वडिलांचा परिचय होता. त्यामुळे कांही प्रसंगी त्यांच्याकडे आमच्या आई-वडिलांचं जाणं होत असे. त्यातून शिवाजी पार्कचा वनिता समाज हाही एक दुवा होताच. त्यामुळे आईशी जवळीक. परवा कर्तृत्ववान पुष्पाशी बोलतांना तिच्या व अनिलच्या व्यवसायातील बरीच गौरवास्पद व भूषणावह माहिती मला मिळाली.



*Above: 1) Western India Swimming Competition winners. On left Pushpa with trophy at CCI, Brabourne Stadium, Mumbai... 2) Pushpa in swimsuit... 3) From left: Well known swimmers Medha Bapat, Parviz Parekh and Pushpa. In front Simta Desai/Divgikar...*



*1) ) Western India Swimming Competition, CCI, Pushpa with winning trophy… 2) Old Mahatma Gandhi Olympic Swimming Pool-MGMOSP… 2) Reunion of MGMOSP at hotel Park Club in 2019. From left: Waterpolo player Mohan Karnik, Pushpa and Avinash Sarang… 3) Waterpolo player Clement Mendoza and Pushpa… Photo courtesy: Pushpa.*



*1) Reunion of MGMOSP at Park Club in 2019. Waterpolo player Mohan Karnik, Ravi Joshi, Pushpa and Waterpolo player Vinod Guruji… 2-3) Graceful and Elegant couple Pushpa/Mohini & Anil Bhadsavle… Below: Pushpa's precious 'International Gems' Jewelry business shop at Pennsylvania…*




उद्योगपती अनिलचे चार कारखाने असून नुकत्याच नव्याने सुरु केलेल्या पांचव्या

कारखान्याचं काम सुरु असून तो डेलावेअरला आहे. कोळसा साफ करण्यासाठी लागणाऱ्या 'मंगनाईट' द्रव्य करणारा कारखाना जो संपूर्ण अमेरिकेत तीन कंपन्याच पार पाडतात, त्यातील एक कारखाना अनिलचा गणला जातो. मंडळी, एक कारखाना उभा करायचा म्हणजे जिद्द, महत्वाकांक्षा, प्रचंड प्रमाणात आर्थिक बळ व पाठिंबा लागतो. परंतु, तो पूर्ण करण्याआधीच कळत न कळत येणाऱ्या अनेक अडी-अडचणींना, लोभी मंडळींना तोंड द्यावं लागतं. अमेरिका जरी असली तरी, धंदा व्यवसाय करतांना विनाकारण त्रास देणारे व देणाऱ्या कंपन्या येथेही स्वस्थ बसणाऱ्या नाहीत. या सर्व डोकेदुखी अनुभवातून पार पडून अनिलने जे आज पर्यंत यशस्वीपणे यश मिळविले आहे त्याला तोड नाही. घरच्या व्यसायात मग्न असून वयोमानाने आज जरी शरीर साथ देत नसलं तरी, पुष्पां आपल्या मुली (मोना व लिसा) व नातवंडात आनंदाचं जीवन अनुभवीत आहे. हीच तिच्या सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. तसं पाहिलं तर, आपल्या यशस्वी जीवन वाटचालीतून जातांना पुष्पाला काळजी करण्यासारखे कांही जबरदस्त अपघातही झाले होते. दैव कृपेने त्यातून पुष्पा वांचली होती...

ही सर्व जीवन कहाणी ऐकतांना वर सुरुवातीला लिहिलेल्या चंदूच्या त्या बोलक्या वाक्याची *(जयु, असे कित्येक हिरे, या शिवाजी पार्कच्या भूमीत दडले असतील)* आठवण झाली आणि मनात ठरवलं की, कर्तबगार व अष्टपैलू पुष्पा-अनिलवर ओळखवाजा परिचयात्मक लेख लिहायचा. म्हणून नेहमीप्रमाणे त्यांची सविस्तर माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न करण्याचे ठरविले. मग कळलं आपला व्यवसाय सांभाळून त्यातून वेळ काढून समाजकार्य, समाजसेवा, स्थानिक महाराष्ट्र मंडळ व इतर संस्थेत सक्रिय भाग घेऊन आयत्या वेळी घरी येणाऱ्या २५-जणांचा उत्तम स्वयंपाक करणारी सुग्रण पुष्पा जरी ३० वर्षांनंतर स्वतःच्या व्यवसायातून निवृत्त झाली असली तरी अनिलच्या वाढत्या व्यवसायामुळे व व्यापामुळे ती दोघं २४/७ अतिशय बिझी असतात. शिवाय, पेनसिल्व्हेनिया आणि डेलावेअर या दोन्ही





*1) Pushpa and Anil's wedding reception photo: Pushpa's two elder brothers Dr. Avinash on left and Dr. Dilip on right with well known actress Nargis with her sister-actress Shammi at Bramhansahayyak Sangha Shivaji Park... 2) Anil's father Dada Bhadsavale with Actor Sunil Datt and one of the film financiers at Pushpa and Anil's wedding reception... Photo courtesy: Pushpa.*

ठिकाणी त्यांना जावं लागतं. तरीही कुठलेही आढेवेढे न घेता पुष्पाने मला प्रेमाने माहिती पाठविली व फोनवरूनही दिली होती. विशेष महत्वाची माहिती अशी की, नामवंत चित्रकार, पोस्टर पेंटर, सिने पब्लिसिस्ट गोविंद उर्फ दादा भडसावळे हे अनिलचे वडील होत. शिवाय, ते जे. जे. स्कूलमधून पेंटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून उत्तीर्ण झाले होते. दादांविषयी अधिक माहिती म्हणजे, जे. जे. ला असतांना जेव्हा ते अत्यंत हुशार विद्यार्थी गणले होते तेव्हा, मुंबईच्या 'मेट्रो टॉकीज'ची उभारणी त्याच सुमारास एम. जी. एम. या हॉलिवूडच्या कंपनीने करण्यास सुरवात केली होती. याचे इंटिरियर करण्यासाठी एम. जी. एम.चे आर्किटेक्ट भारतात आले ते सरळ जे. जे. मध्ये गेले होते. त्यावेळेस तेथे ब्रिटिश डीन होते. त्यांच्याकडे एका हुषार, होतकरू तरुणाची या 'मेट्रो टॉकीज'च्या इंटिरियरची स्केचेस काढण्यासाठी मागणी केली असतां त्यावेळेस तेथील ब्रिटिश डीनने दादा भडसावळे यांची शिफारस केली होती. आणि त्यांची त्या काळात रु॰ २००/- दरमहा पगारावर नेमणूक झाली होती. हे निश्चित कौतुकास्पद व भूषणावह होतं. पुढे दादांनी आपल्या क्षेत्रात व चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय नांव कमावलं होतं. त्यामुळे चित्रपट सृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांशी त्यांचा परिचय होता. शिवाय, ते ख्यातनाम Cine Publicist

होते. सुनील व नर्गिस यांच्या अजंठा आर्टसचे ते सिने वितरक असल्याने सुप्रसिद्ध अभिनेत्री नर्गिस व अभिनेता सुनील दत्त यांची खास मैत्री होती. त्यामुळे अनिल व पुष्पा यांच्या लग्न कार्याला शिवाजी पार्कच्या ब्राह्मण सहाय्यक संघात ती दोघं व नर्गिसची बहीण अभिनेत्री शम्मी देखील उपस्थित होती. नर्गिसने तर आदल्या दिवशी पुष्पाला मेहंदी पण लावली होती.

*Photo courtesy: Pushpa.*



*1-2-3) Pushpa and Anil's luxury house in Susquehanna River valley at Kittanning, Altoona, PA…*

*All photos are Wilmington, Delaware's new plant construction…*




*Above: 1) Anil's company 'WALAN' Specialty Construction Products, LLC…*
*2) View of part of the Walan site… 3) The type of grinding operation Walan officials say would be at the proposed facility near the Port of Wilmington…*



*1 & 4) Anil at the plant… Current Wilmington, Delaware, New Plant foundation site. Assembly of huge machinery. Where they will produce SLAG which is very special type of cement to be use for highways as well as producing Magnetite in concrete terminal. In their old Kittanning, Altoona, PA plant, they are producing Iron chromite, specially use in gemstone 'Emerald' that is supplied to wineries, brick production etc…*



*Below:* ***1-2) Anil, Pushpa and daughter Lisa is taking some lesser measures at Wilmington, Delaware worksite… 3)*** *Product Storage Silos:* ***After grinding finished product GGBFS will be stored in sealed Silos with dustless loading spout…***



त्यांची मर्सिडीज गाडीही त्यांच्या कार्यात तैनातीला होती. तसेच, इतर नामवंत सिने कलावंतही कार्याला उपस्थित होते. तसेच, दादा दिसायला देखणे, उंचपुरे व त्यांचं व्यक्तिमत्व आकर्षक होतं. असो. अनिलला व पुष्पाला शास्त्रीय संगीताची आवड आहे. त्यामुळे अनेक गायक कलाकार त्यांच्याकडे येत असत, त्यांच्याशी परिचय होता त्यामुळे नामवंत कलाकारांच्या गायनाच्या बैठका त्यांच्या घरी नियमित होत असत. कांही वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध तब्बला वादक व गायक रवी दाते हे सपत्नीक त्यांच्याकडे आले असतांना ज्योती दाते यांनी पुष्पा व अनिल यांची मुलाखत घेतली होती. आणि ती मुलाखत महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रकाशित झाली होती. परंतु, याला अनेक वर्ष लोटली होती. त्यामुळे ती सांपडणं अशक्य होतं. पण पुष्पाने ती मला मिळवून दिली होती. सुदैवाने माझं काम सोपं झालं  होतं. असो. *'दाने दाने पर लिखा है खानेवाले का नाम'* म्हणतात, अगदी तसंच झालं. योगायोगाने पुष्पा व अनिल यांच्या लग्नाचा ५०वा वाढदिवस होता म्हणून पुष्पाचा शाळकरी वर्गमित्र व आमचा शिवाजी पार्कचा कर्तव्यदक्ष आल्हाद/चंदू धनेश्वरच्या माहितीपूर्ण मेल्स मला आल्या. चंदूच्या त्या मेल्स मधूनही मला माहीत नसलेली थोडीफार माहिती मिळाली होती... अशी ही अष्टपैलू पुष्पा व कर्तृत्ववान अनिल यांच्या व्यवसायातील गौरवास्पद, यशस्वी व कौतुकास्पद माहिती वाचून आपल्यालाही त्यांचा निश्चित अभिमान वाटेल यात शंका नाही... *We wish Pushpa and Anil Happy 50th Wedding Anniversary and many more years of fun, enjoyment, happiness, with healthy life ahead..!*

जयंत विठ्ठल कुळकर्णी.
jvkny1@gmail.com

ता. क: हा लेख लिहिण्यासाठी मला चंदू धनेश्वर व आनंद सारंग यांची मदत झाली. त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. तसेच, पुष्पा व अनिल यांनीही आपल्या बिझी

जीवनातून वेळात वेळ काढून मला प्रेमाने सहकार्य केलं, माहिती पुरविली व दुर्मिळ फोटो दिले. त्यामुळे हा सचित्र लेख अधिक वाचनीय व उद्‌बोधक झाला. त्याबद्‌दल पुष्पा व अनिल यांचा मी मनापासून आभारी व ऋणी आहे.

---